सकाळ

# कथा, कवितेतून जीवन अनुभवांचे सादरीकरण

## शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात लेखक, कवींचा सहभाग

परभणी, ता. १७ : साहित्य अकादमी व शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित साहित्य मंच उपक्रमात लेखक, कवींनी मानवी जीवनातील नातेसंबंधांवर भाष्य करणाऱ्या कथा आणि रंगतदार कवितांच्या माध्यमातून आपले वैविध्यपूर्ण जीवन अनुभव सांगितले.



परभणी : शिवाजी महाविद्यालयात साहित्य मंच कार्यक्रमात कवी, लेखकांनी आपल्या कथा, कविता सादर केल्या. यावेळी प्राचार्य डॉ. बी.यू. जाधव, साहित्यिक डॉ. आसाराम लोमटे व अन्य कवी.

शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.यू. जाधव होते. साहित्यिक डॉ. आसाराम लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. लोमटे यांनी प्रास्ताविकात साहित्य मंचच्या उपक्रमाचा हेतू विशद केला. प्रारंभी बा.बा. कोटंबे यांनी 'पडझड' या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील पेच सांगितला. मिलिंद जाधव यांनी 'खुलासा' या कथेतून एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या नाट्यावर प्रकाश टाकला.

मोहन कुलकर्णी यांनी यावेळी 'बंद खिडकीच्या आत', 'पाऊस, काही टिपणं', 'देह सजवायचा' या कविता सादर केल्या. कवी संतोष नारायणकर यांनी 'देव परिक्षा घेतात', 'कपड्यांचा संदुक', 'दोन पाय, दोन हात' या कविता सादर केल्या. 'अशीच एकदा त्यांनी माझी विचारली होती जात, मी म्हणालो काय सांगु, दोन पाय दोन हात' या कवितेतून त्यांनी सामाजिक जाणीव सांगितली. जसे येतात दिवस तसेच निघून जातात बघतो तर काय, काहीच नसते हातात या कवितेतून त्यांनी अभावग्रस्त दिवसांचे वर्णन केले.

### 'सताड उघड्या खिडकीच्या गजातून'

'सताड उघड्या खिडकीच्या गजातून, तिनं आभाळ ठिबकताना पाहिलं, आणि स्वतःच्याच पापण ओल्या, डोळ्यातून ती मोर नाचवत राहिली,' या त्यांच्या ओळींना उपस्थितांनी दाद दिली. कवी केशव खटींग यांनी यावेळी 'मॉडगेज', 'दिस कडूशार झाले', 'लेक म्हणजे कवितेचे प्रत्यक्ष रूप' या कविता सादर केल्या. पहिल्या कवितेत कर्जबाजारी शेतकऱ्याची व्यथा सांगितली, तर दुसऱ्या कवितेत ढासळलेल्या गावगाड्याचे त्यांनी वर्णन केले, तर 'लेक म्हणजे कवितेचे प्रत्यक्ष रूप, तिच्याशी बोलताना कोणत्याही बापाला मायेची हळूवार आंतरिक लय सापडते. मंदिरातली काश्याची घंटा वाजावी आणि आवाजाची आवर्तने घुमत जावीत, हवेत तशी लेक असते बापाच्या भावविश्वात' या त्यांच्या ओळींना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

सूत्रसंचलन प्रा. बडुरे यांनी केले, तर प्रा. प्रल्हाद भोपे यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ कवी केशव बा. वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड, माणिक पुरी, प्रा. जयंत बोबडे, प्रा. सखाराम कदम, सुरेश हिवाळे, शरद ठाकर, बालासाहेब जाधव, दत्ता चव्हाण, त्र्यंबक वडसकर, प्रा. प्रवीण पुरी, प्रा. मयूरी शिंदे, प्रा. सारिका पासंगे, प्रा. स्वाती देशमुख, मारोती डोईफोडे, माणिक रासवे, सुरेश पेदापल्ली आदी उपस्थित होते.